मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४

संदर्भ क्र.:एमएमसीसी/ महाराष्ट्र स्टेट स्कॉलरशिप / २०२३-२४/ 302 १२ डिसेंबर, २०२३

## नोटीस

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२३-२०२४ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे बाबत

कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि स्कॉलरशिप अथवा फ्रीशिप अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने भरण्याची प्रक्रिया सन २०२३-२०२४ करीता चालू झालेली असून, जे विद्यार्थी अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील असून, शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत अश्या विद्यार्थ्यांनी FRESH तसेच RENEWAL चे अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. सर्व पात्र नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे व ज्या विद्यार्थ्यांनी या पूर्वी वरील नमूद वेबसाईटवर अर्ज भरले आहेत अश्यानी त्यांचे या पूर्वीच्या userid नेच अर्ज भरावे. नवीन तयार केलेला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी. सदर अर्ज भरतेवेळी नमूद केलेले सर्व ओरिजनल कागपत्रे २५६ kb च्या आत jpeg स्वरूपात अपलोड करावे.

**चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी M.M.C.C. COLLEGE (२७२५१४०१५२८) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थ्यांनी Marathwada Mitra Mandal's College of Commerce (३४८९) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. व फी भरल्याबाबतच्या रकान्यात ०.०० (शून्य रुपये) असे नमुद करावे.**

RENEWAL करीत असताना Online दिलेल्या सूचना काटेकोरपणे वाचून त्याप्रमाणे Profile Update करावा, उदाहरणार्थ चालू शैक्षणिक वर्ष तसेच इतर आवश्यक ते बदल करूनच, अर्ज मागील (२०२२-२०२३) वर्षी लागू केलेल्या शिष्यवृत्तीस (Scholarship) अथवा फ्रीशिपसाठी (Freeship) पुनःश्च लागू करावा.

**शिष्यवृत्ती (Scholarship) साठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/- पर्यंत आहे व व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीता रु. १,५०,०००/- पर्यंत आहे. तसेच अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती साठी फ्रीशिप (Freeship) साठी उत्पन्न मर्यादा नसून व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव फ्रीशिप (Freeship) साठी ची कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/- इतकी आहे. BBM-IB या अभ्यासक्रमाकरीता व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील विद्यार्थ्यांना कुठल्याही शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप चा लाभ घेता येणार नाही याची सर्वानी कृपया नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | १० वी, १२ वी/ ग्रॅज्युएशन उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| २. | मागील शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स ) ऑनलाईन निकाल असल्यास महाविद्यालयाने साक्षांकित केलेली प्रत |
| ३. | १० वी /१२ वी /ग्रॅज्युएशन पदवी सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ४. | विद्यार्थ्यांच्या नावाचे डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ५. | विद्यार्थ्यांच्या नावाचा जातीचा दाखला (झेरॉक्स) |
| ६. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०२२-२०२३ चा तहसीलदार चा दाखला ( उत्पन्न मर्यादा योजनेच्या नियमांनुसार)(Original) |
| ७. | आधारकार्ड (झेरॉक्स) |
| ८. | राशनकार्ड (झेरॉक्स) |
| ९. | विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकचे पहिले पान (Original) |
| १०. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (झेरॉक्स) अथवा महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट |
| ११. | चालू वर्षा करीता पालकांचे अपत्यां बाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐकावेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल.

अचूक अर्ज भरून झाल्यावर वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार) आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जमा करावे.

MAHADBT पोर्टल वर ऑनलाईन अचूक अर्ज भरलेलया तसेच महाविद्यालयात अर्जाची प्रत व इतर वरील नमूद कागपत्रे सादर केलेल्या अर्जांवरच महाविद्यालय स्तरावरून कार्यवाही केली जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्त मागासवर्गीय पात्र विदयार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार लागू असल्याप्रमाणे स्कॉलरशिप अथवा फ्रीशिपचा अर्ज भरणे क्रमप्राप्त असून, तो न भरल्यास अथवा मंजूर न झालयास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील व महाविद्यालयाची शैक्षणिक फी व इतर उर्वरित फी भरणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील. व त्याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार स्वीकारली जाणार नाही.

डॉ. देविदास गोल्हार
प्राचार्य

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी
सोबत: RENEWAL करण्याबाबची कार्यपद्धती जोडली आहे.